महाराष्ट्र शासन
सहायक धर्मादाय आयुक्त, बुलडाणा
यांचे कार्यालय

सार्वजनिक न्यांस नोंदणी कार्यालय,
प्रशासकीय इमारत २-या मजल्यावर,
बस स्टॅण्ड समोर बुलडाणा.
supdtest.bu-mh@gov.in

Office of Assistant Charity Commissioner
Govt.Building, 2nd Floor, Opp. Bus Stand
Buldana Tel.No.07262-242606
acc.bu-mh@gov.in

जा.क्र./आस्था/ 235/26 दिनांकः 20/01/2026

प्रती,
संगणक शाखा,
धर्मादाय आयुक्त कार्यालय ,
मुंबई.

विषयः निविदा सूचना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत

महोदय,

वरील विषयास अनुसरून की, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बुलढाणा या कार्यालयातील सफाईगार पदासाठीची निविदा सूचना धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी ही विनंती.

सोबतः निविदा सूचनेची प्रत

20/01/2026
श्रीमती डी.के.साहू
सहायक धर्मादाय आयुक्त
बुंलढाणा विभाग बुलढाणा

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
सहायक धर्मादाय आयुक्त, बुलडाणा
यांचे कार्यालय

सार्वजनिक न्यांस नोंदणी कार्यालय,
प्रशासकीय इमारत २-या मजल्यावर,
बस स्टॅण्ड समोर बुलडाणा,
supdtest.bu-mh@gov.in

Office of Assistant Charity Commissioner
Govt.Building, 2nd Floor , Opp. Bus Stand
Buldana Tel.No.07262-242606
acc.bu-mh@gov.in

जा.क्र./आस्था/ 236/26

दिनांक: 20/01/2026

## निविदा सूचना

या जाहीर प्रसिद्धी करणाद्वारे सर्व संबधितास सूचित करण्यात येते की,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बुलढाणा या कार्यालयासाठी सफाईगार या पदाचे कामकाज करणेसाठी बाह्ययंत्रणेमार्फत मान्यता प्राप्त संस्था/कंपनी/ठेकेदार यांचे कडून एक उमेदवारांची सेवा कंत्राटी तत्वावर उपलब्ध करून घ्यावयाची आहे. सबब मान्यता प्राप्त संस्था/कंपनी/ठेकेदार यांचेकडून 11 महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्वावर सफाईगार या पदाची सेवा उपलब्ध करून घेणेकामी सीलबंद लखोट्यामध्येदिनांक 30/01/2026 दुपारी 05:00 वाजेपर्यंत वर नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्यासाठीचा निविदा प्रक्रिया कार्यक्रम खालीलप्रमाणे राबविण्यात येत आहे.

सदरची निविदा सुचना www.charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

### निविदा प्रक्रिया कार्यक्रम

| अ.क्र. | तपशील | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | जाहीर नोटीस काढणे | 20/01/2026 | |
| 02 | जाहीर नोटीस प्रसिद्धकरणे(कार्यालयीन नोटीस बोर्ड) | 20/01/2026 | |
| 03 | जाहीर नोटीस संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | 21/01/2026 | |
| 04 | निविदा स्वीकारणे अंतिम तारीख | 29/01/2026 | |
| 05 | तीन पेक्षा कमी दरपत्रक प्राप्त झाल्यास एक आठवड्याची मुदतवाढ | 04/02/2026 | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 06 | खरेदी समिती समोर निविदा उघडण्याची तारीख | 30/01/2026 | |
| 07 | निविदा उघडल्यास आदेशानुसार तुलनात्मक तक्ता तयार करणे व L-1 ठरविणे | 02/02/2026 | |

टीपः संबधित निविदाधारकाने किंवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधीने दिनांकः 30/01/2026 रोजी दुपारी 05:00 वाजता सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,बुलढाणा येथे हजर राहावयाचे आहे.

20/01/2026

श्रीमती डी.के.साहू
सहायक धर्मादाय आयुक्त
बुलढाणा विभाग बुलढाणा

प्रतः 1) कार्यालयीन नोटीस बोर्ड
2) कार्यालयीन धारिणी

**सफाईगार पदाचे कामाचे स्वरूप**

1. सफाईगाराने दररोज कार्यालयातील मोठा हॉल, दोन्ही कोर्ट रूम, दोन्ही सहायक धर्मादाय आयुक्त यांचे खाजगी कक्ष,अभिलेखा कक्ष येथील केरकचरा काढून व पोछ्या मारून स्वच्छ ठेवणे
2. कार्यालयातील सर्व शौचालये दररोज स्वच्छ करणे
3. कार्यालयातील अधिकारी सांगतील ती कामे करणे

सफाईगराच्या कामकाजाची वेळ सकाळी 09:30 ते 06:30 अशी राहील

**सफाईगार पदासाठीची पात्रता**

1. उमेदवार हा 8 वी उत्तीर्ण असावा.
2. उमेदवारास मराठी /हिंदी भाषा लिहिता व वाचता यावी.
3. उमेदवारास शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये सफाईगाराच्या कामाचा अनुभव असावा.
4. उमेदवार हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा.
5. उमेदवारास कोणत्याही प्रकारचे व्यसन नसावे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती----**

1) सफाईगार या पदासाठीच्या निविदा सीलबंद स्थितीत या कार्यालयात दिनांकः 29/01/2026 पर्यंत दुपारी 05:00 वाजेपर्यंत पोहोचतील पद्धतीने स्वीकारल्या जातील. निविदा कार्यक्रमात नमूद दिनांकानंतर आलेल्या निविदांचा स्वीकार केला जाणार नाही.
2) सफाईगार पदासाठीचा उमेदवार हा शारीरिक दृष्ट्या सक्षम,निरोगी व चांगल्या वर्तवणुकीचा असावा.वय 18 ते 55 पर्यंत.

Scanned with OKEN Scanner

3) व्यसनाधीन,गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या कर्मचाऱ्याची नेमणूक केली जाणार नाही.तसेच संबधित कर्मचाऱ्याची पोलीस चारित्र्य पडताळणी करून त्याचा अहवाल संबधित कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेने कार्यालयास दाखल करावा.

4) कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थे द्वारे पुरविल्या गेलेल्या कर्मचाऱ्याचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर अथवा या कार्यालयावर असणार नाही.संबधित कर्मचारी हा त्या कंत्राटदार/ठेकेदार अथवा कंपनीचा कर्मचारी असेल.

5) संस्थेने कर्मचाऱ्याला गणवेश व ओळखपत्र उपलब्ध करून द्यावे.

6) सफाईगार या पदावरील सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याचे वेतन महिन्याच्या 5 तारखेपर्यंत बँकेच्या त्याच्या खात्यावर जमा होईल अशा पद्धतीने करावे व त्याची पावती कार्यालयास सादर करणे कंपनीला बंधनकारक असेल.तसेच त्याच्या वेतनातून provident fund विमा रक्कम,व इतर संवैधानिक देणी वेळेवर अदा करण्याची जबाबदारी संस्था/कंपनीवर असेल.

7) सफाईगार या पदावरील सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याचे वेतन प्रती/व्यक्ती दर हा किमान वेतन कायदा 1948 प्रमाणे असावा सदर कायद्याप्रमाणे नमूद किमान वेतनापेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास संबधित संस्था/कंपनी यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

8) कर्मचारी रजेवर अथवा गैरहजर असल्यास पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

9) गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यास कार्यालयाने निर्देशित केल्यावर तात्काळ कामावरून काढून टाकावे लागेल व पर्यायी व्यवस्था करून द्यावी लागेल.अन्यथा दंडात्मक कार्यवाही होईल.

10) नियुक्त केलेल्या उमेदवारास 01 दिवस साप्ताहिक सुट्टी राहील.

11) सफाईगार या पदावरील सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्याचा अपघात झाल्यास अथवा काही इजा झाल्यास खर्चाची पूर्तता करण्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

1) सफाईगारास कर्तव्यावर असताना धुम्रपान किंवा मादक पदार्थाचे सेवन करता येणार नाही.

2) सफाईगार म्हणून निवड झाल्यास इतर कोठेही नौकरी,व्यवसाय करता येणार नाही.

3) सफाईगारास कर्तव्य कालावधीत कर्तव्याच्या ठिकाणापासून इतरत्र जाता येणार नाही.

4) सफाईगारास सेवा विषयक बाबी लागू राहणार नाही.

5) सफाईगाराच्या कर्तव्य कालावधीत सफाईगाराकडून काही गैरवर्तवणूक,गैरकृत्य झाल्यास अथवा मद्य किंवा नशायुक्त पदार्थाचे सेवन केलेले आढळल्यास संबधित सफाईगारास कामावरून काढून टाकण्यात येईल.

6) सफाईगारास सेवाकाळात काही कारणाने कर्तव्यावर हजर राहणे शक्य नसल्यास कार्यालयातील शिपायास पूर्वकल्पना देऊन अथवा परस्परसंमतीने जावे.

7) कार्यालयातील वस्तू,साधने जसे कि संगणक,प्रिंटर,खुर्च्या,टेबल किंवा इतर कोणत्याही बारीक-सारीक वस्तू यांना परवानगी शिवाय हात लावू नये.एखादी वस्तू चोरी झाल्यास,गहाळ झाल्यास संबधित सफाईगारास जबाबदार ठरवून वस्तूच्या नुकसानीची वसुली करण्यात येईल.

8) वर नमूद अटींची व शर्तीची पूर्तता करणाऱ्या संस्थाकडून निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे.

9) कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत 11 महिन्यांपेक्षा जास्त राहणार नाही.

10) निविदा मंजूर झालेनंतर निविदाधारकाने कंत्राटाविषयी लागू असलेले सर्व नियम व कायदे यांचे पालन करणे बंधनकारक आहे.

Scanned with OKEN Scanner